


दैनिक निडर निर्भिड
# जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!




संपादक : जितेंद्र कायस्थ
Mob- 9822720784 Email- jansanchlan@gmail.com RNI NO-MAHMAR/2022/90217

वर्ष ३ रे | अंक : २६३ वा | बुधवार दि ३१ डिसेंबर २०२५ | पृष्ठ ८ | किंमत ३ रुपये

# दैनिक जनसंचलनचा जबरदस्त दणका!

## हम ने कहा था न सत्य परेशान हो सकता है, पराजित नही!...

## डोंगरखंडाळा जमीन प्रकरणात मोठा स्फोट; मुख्यमंत्री सचिवालयाची थेट कडक दखल कोणीही असो,कारवाईत सुट नाही!

**जनसंचलन/बुलढाणा**

जिल्ह्यात गाजत असलेले डोंगरखंडाळा येथील गट नंबर १७५ मधील ११.३१ आर सामायिक शेतीवरून पेटलेले जमीन प्रकरण आता थेट मंत्रालयापर्यंत पोहोचले असून, दैनिक जनसंचलनने उघड केलेल्या गंभीर आरोपांमुळे प्रशासनात खळबळ उडाली आहे. या प्रकरणात पुणे येथील उपजिल्हाधिकारी व मंत्रालयातील ओ.एस.डी.सिद्धार्थ भंडारे यांच्यावर पदाचा दुरुपयोग केल्याचा थेट आणि गंभीर आरोप करण्यात आला आहे.पीडित व तक्रारदार राहुल मिनानाथ तारे यांनी मुख्यमंत्री सचिवालय आणि महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्याकडे धाव घेतल्यानंतर अखेर मुख्यमंत्री सचिवालयाने या प्रकरणाची कडक दखल घेत संबंधित विभागाला तात्काळ चौकशीचे आदेश दिले आहेत.राहुल तारे यांनी तक्रारीत नमूद केले आहे की, सदर जमीन अनेक दशकांपासून त्यांच्या कुटुंबाच्या ताब्यात असून दिवंगत वडील मिनानाथ तारे हे आणीबाणी काळातील लोकतंत्र सेनानी होते. जमीन आजही सामायिक असून सर्व वारसांची नोंद सातबारावर झालेली नाही. इतकेच नव्हे, तर ही जमीन ग्रामसेवा सहकारी सोसायटीकडे तारण असून, याच जमिनीबाबत न्यायालयात लिज पेंडन्सी क्रमांक ४३३९/२०२३ दाखल असून प्रकरण न्यायप्रविष्ट आहे. असे असताना, प्रतिवादी असलेले ओ.एस.डी. तथा उपजिल्हाधिकारी सिद्धार्थ भंडारे यांनी कथितपणे काही अधिकाऱ्यांशी संगनमत करून छत्रपती संभाजीनगर येथील मावसभाऊ महेंद्र राऊत यांच्या नावावर बेकायदेशीर खरेदीदस्त तयार करून नोंदणी घडवून आणल्याचा आरोप करण्यात आला आहे.हरकती नोंदवूनही मंडळ अधिकाऱ्यांनी नियमबाह्य फेरफार केल्याचा धक्कादायक दावाही तक्रारीत करण्यात आला आहे. हा प्रकार सरळसरळ पदाचा दुरुपयोग, संगनमत आणि जमीन बळकावण्याचा गंभीर प्रकार असल्याचा आरोप करत संबंधित सर्व अधिकाऱ्यांवर कठोर कायदेशीर कारवाईची मागणी करण्यात आली आहे. बेकायदेशीर खरेदीदस्त, फ रफार व सातबाराची नोंद तत्काळ रद्द करावी,अशी ठाम मागणी तारे यांनी केली असून, आता मुख्यमंत्री सचिवालयाच्या आदेशानंतर या प्रकरणात मोठी कारवाई होणार का, याकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे. दैनिक जनसंचलनने सातत्याने केलेल्या पाठपुराव्यानंतर अखेर मुख्यमंत्री सचिवालयाने या गंभीर प्रकरणाची प्रशासकीय दखल घेत संबंधित विभागाला तात्काळ चौकशीचे आदेश दिले आहेत. यामुळे महसूल प्रशासनात एकच खळबळ उडाली आहे.



पीडित तारे परीवार

## शेती व्यवहारात १७ लाखांची फसवणूक; चार जणांवर गुन्हा खोटी प्रकरणे दाखल करण्याची धमकी...

**जनसंचलन/ देऊळगाव राजा**

शेती विक्रीचा बनावट व्यवहार करून एका तरुणाची तब्बल १७लाख रुपयांनी फसवणूक केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. पैसे परत मागितल्यास खोट्या गुन्ह्यांत अडकवण्याची धमकी देण्यात आल्याचा आरोपही पोलिस तक्रारीतून करण्यात आला आहे. या प्रकरणी देऊळगाव राजा पोलिस ठाण्यात जालना जिल्ह्यातील अंतरवली राठी येथील चार जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गारगुंडी (ता. देऊळगाव राजा) येथील गणेश तुकाराम काकड (वय ३४) यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, आरोपींनी संगनमत करून जालना जिल्ह्यातील अंतरवली राठी शिवारातील एका गटातील शेती विक्रीचा सौदा असल्याचे भासवले. या नावाखाली तक्रारकर्त्याकडून टप्प्याटप्प्याने १७लाख रुपये उकळण्यात आले; मात्र प्रत्यक्षात शेतीची कोणतीही कायदेशीर विक्री न करता आर्थिक फसवणूक केल्याचा आरोप तक्रारीत नमूद आहे. तक्रारकर्त्याने नमुद केले आहे की, पैसे परत मागितल्यावर आरोपींकडून दबाव वाढवण्यात आला. कौटुंबिक हिंसाचारासह खोट्या प्रकरणांत अनकनागानी बााकी रिली गेली नगेन जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पैसे मागितले तर गंभीर परिणाम भोगावे लागतील, अशी धमकी दिल्याचेही तक्रारीत नमूद आहे. ही फसवणूक ८ मे २०२३ ते १४ नोव्हेंबर २०२३ या कालावधीत घडल्याचे तपासात समोर आले आहे. या प्रकरणात काकड यांच्या तक्रारीवरून देऊळगाव राजा पोलिसांनी दि. ३० डिसेंबर रोजी चार जणांविरोधात गुन्हा नोंदवला. शेती व्यवहार, आर्थिक देवघेव आणि धमक्यांचा सखोल तपास सुरू असून, संबंधित कागदपत्रे, व्यवहारांचे पुरावे आणि साक्षी तपासले जात आहेत, असे पोलिसांनी सांगितले. पोलिस अधीक्षकांच्या परवानगीनंतर गुन्हा नोंदवण्यात आला असून, तपास पोलिस निरीक्षक ब्रह्मा गिरी यांच्या मार्गदर्शनाखाली




पोलीस उपनिरीक्षक परवीन पटेल करीत आहेत. या घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली असून, शेती व्यवहारांच्या नावाखाली होणाऱ्या फसवणुकीचा आणखी एक गंभीर प्रकार समोर आला आहे.

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!


# राष्ट्रीय ओळख कशात?

**संपादकीय लेख**




आपण आपली राष्ट्रीय अस्मिता कशात पाहतो? आपल्या जन्मभूमीत, धर्मात, संस्कृतीत की भाषेत? बहुतेक देशांमधील लोक या सर्व घटकांद्वारे आपली राष्ट्रीय ओळख अधोरेखित करीत असले, तरी त्यातही महत्त्व कशाला देत असावेत? अमेरिकेतील प्यू रिसर्च सेंटर या संस्थेनं याबाबत केलेल्या पाहणीतील निरीक्षणं दिशादर्शक म्हणता येतील. २०२३ आणि २०२४मध्ये ३६ देशांतील लोकांशी बोलून केलेल्या या पाहणीचे निष्कर्ष देशनिहाय वेगळे आहेत; काही देशांत जन्मावरील राष्ट्रीयत्वाला अपार महत्त्व दिलं जातं, तर काही ठिकाणी धर्म आणि संस्कृती यांमध्ये राष्ट्रीयत्व निश्चित केलं जातं. या तिन्हींबाबत वेगवेगळ्या देशांतील आकडे भिन्न आहेत; परंतु राष्ट्रीयत्वाचा एक निकष बहुतेक देशांतील बहुमतात आहे. तो निकष म्हणजे : भाषा. पाहणी केलेल्या सर्व देशांत, आपल्या राष्ट्रीयत्वाची ओळख भाषेतून निश्चित होते, असं म्हणणाऱ्यांचं प्रमाण पन्नास टक्क्यांहून अधिक आहे. त्यांत भारतासारखे बहुभाषक देशही आहेत. भाषेत राष्ट्रीयत्व पाहणाऱ्यांचं सर्वाधिक प्रमाण आहे बांगलादेशात; तिथं ८४ टक्के लोक भाषा आणि अस्मिता हे समीकरण मान्य करतात. (गेल्या दीडेक वर्षात बांगलादेशच्या राष्ट्रीय अस्मितेच्या मुळालाच धक्का लावण्याचा प्रयत्न झाला असून, तिथं धर्म ही राष्ट्रीय ओळख निर्माण करण्याचा प्रयत्न जोरात सुरू आहे. त्यामुळे भाषिक अस्मितेची धार आता काहीशी बोथट झाली असू शकते.) बांगलादेशाच्या खालोखाल हे प्रमाण इंडोनेशिया (८३ टक्के), फिलिपिन्स (८०%), हंगेरी (७४%), ब्राझील (७४%), मेक्सिको (७०%), फ्रान्स (६४%), जर्मनी (६२%) आहे. भारतात हे प्रमाण ६० टक्के आहे. सिंहला आणि तमिळ या दोन प्रमुख भाषा असलेल्या श्रीलंकेत सिंहला भाषा आणि राष्ट्रीयत्व यांना प्राधान्य देणारे ७४ टक्के, तर तमिळ राष्ट्रीयत्व उचलून धरणारे ४१ टक्के आहेत. श्रीलंकेतील सिंहला आणि तमिळ यांच्या वादातील मूळ यातून लक्षात येते. ब्रिटन, ऑस्ट्रेलिया, तुर्कीये, स्वीडन या देशांत हे प्रमाण ५० टक्क्यांहून अधिक आहे. अमेरिका (४८%), कॅनडा (४९%) आणि इस्रायलमध्ये (४३%) ते निम्म्याहून कमी असले, तरी ४० टक्क्यांहून अधिक आहे. सिंगापूरमध्ये मात्र ते केवळ २३ टक्के आहे. याचा अर्थ असा, की सिंगापूर वगळता अन्य देशांतील लोक भाषेमध्ये राष्ट्रीय अस्मिता पाहणाऱ्यांचे प्रमाण ४० टक्क्यांहून अधिक आहे. दोन-तीन किंवा त्याहून अधिक भाषा बोलल्या जाणाऱ्या देशांतील लोकही याला अपवाद नाहीत. बहुभाषक भारतात भाषेला राष्ट्रीय अस्मिता मानणाऱ्यांचं प्रमाण ६० टक्के आहे. मात्र, अन्य देश आणि भारत यांच्यात एक फरक आहे. तो म्हणजे जन्मस्थान आणि राष्ट्रीयत्व यांची सांगड घालणाऱ्यांचं प्रमाण भारतात अधिक म्हणजे ८२ टक्के आहे; अन्य देशांत ते तुलनेनं खूपच कमी आहे. अमेरिकेत हे प्रमाण २४ टक्के, कॅनडात १३ टक्के, जर्मनीत १४ टक्के, तर स्वीडनमध्ये जेमतेम चार टक्के आहे. जन्मस्थानाला अस्मितेशी जोडणाऱ्यांचं प्रमाण भारताप्रमाणेच बांगलादेश (८३ %), फिलिपिन्स (७७ %), इंडोनेशिया (७३ %), ब्राझील (७१ %), मेक्सिको (६६ %) आहे. आपल्या जन्मभूमीबद्दलच्या अभिमानाचे रूपांतर अस्मितेत होणं आणि देशाची प्रगती होणं यांत परस्परसंबंध नसावा; परंतु स्वीडन, ब्रिटन, फ्रान्स, जर्मनी आदी युरोपीय देशांमधील लोक जन्मभूमीला अस्मितेशी जोडत नसल्याचे याबाबतच्या पाहणीतून दिसते. या निकषाच्या बाबतीत ऑस्ट्रेलिया या देशांच्या रांगेत बसतो. अस्मितेसाठी जन्मभूमीला प्राधान्य देणाऱ्यांचं प्रमाण तिथं केवळ आठ टक्के आहे! हीच गोष्ट तिथं धर्माच्या बाबतीतही आहे. बहुतेक प्रगत देशांत धार्मिक अस्मिता मानणाऱ्यांचं प्रमाण कमी, तर प्रगतिपथावरील देशांत ते अधिक असं चित्र आहे. जन्मभूमी, धर्म, संस्कृती यांपेक्षा भाषेला अस्मितेशी जोडणाऱ्यांची संख्या बहुतेक देशांत अधिक आहे. जगात अनेक ठिकाणी भाषिक अस्मिता टोकदार होण्यामागचे कारण यात दडलेले असावे.




The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue Court. 9822720784.
(RNI NO-MAHMAR/2022/90217) Email- jansanchlan@gmail.com

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# धनुष्यबाणावर लढायची ऑफर, शिंदेंची भेट, भाजपमधून ग्रीन सिग्नल; तरीही उमेदवाराची माघार

**मुंबई :** मुंबईसह २९ महापालिका निवडणुकांसाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्याची अखेरची तारीख आज होती. त्यामुळे आज मोठ्या प्रमाणात बंडखोरी पाहायला मिळाली. पक्षानं तिकीट नाकारल्यानं अनेकांनी बंडखोरी केली. काहींनी अन्य पक्षाम धून, तर अनेकांनी अपक्ष अर्ज भरले. ही बंडखोरी रोखण्याचं आव्हान आता राजकीय पक्षांसमोर असेल. एकीकडे बंडोबांचं पीक आलेलं असताना भाजपच्या अक्षता तेंडुलकर यांनी महापालिका निवडणुकीतून माघार घेतलेली आहे.भाजप नेत्या अक्षता तेंडुलकर यांनी शिवसेनेच्या धनुष्यबाण चिन्हावर लढण्यास नकार दिला आहे. प्रभाग क्रमांक १९२ मधून त्यांना शिवसेनेनं धनुष्यबाणावर लढण्याची ऑफर दिली होती. हा प्रभाग भाजपला मिळावा यासाठी जागावाटपात बरेच प्रयत्न झाले. पण अक्षता तेंडुलकर यांच्यासाठी भाजपला हा प्रभाग हवा होता. पण शिंदेसेनेनं हा प्रभाग वाटाघाटीत आपल्याकडे खेचला. शिंदेसेनेनं भाजपसाठी प्रभाग न सोडता तेंडुलकर यांना आपल्या चिन्हावर लढण्याची ऑफर दिली. ती तेंडुलकर यांनी नाकारली. या संदर्भात तेंडुलकर यांनी फ सबुकवर एक पोस्ट लिहिली आहे. घडलेला संपूर्ण घटनाक्रम, धनुष्यबाणावर न लढण्याचं कारण त्यांनी पोस्टमध्ये नमूद केलं आहे.एकम व ओपन कॅटेगरीत असलेल्या वॉर्ड क्रमांक १९२ मधून निवडणूक लढवण्यास मी इच्छुक होते, काल दुपारपर्यंत भाजपच्या नेत्यांनी हा वॉर्ड भाजपला लढवण्यास मिळावा यासाठी अतोनात प्रयत्न केले. मात्र महायुतीच्या निर्णयानुसार हा वॉर्ड शिवसेनेला मिळाला.एक स्ट्रॉंग उमेदवार म्हणून शिवसेनेकडून मला हा वॉर्ड लढवण्यासाठी दुपारी ऑफर आली. त्यानुसार काही वरिष्ठांशी चर्चा करून या प्रयोगाविषयी चाचपणी करण्यात आली. याला अनुसरून काल आम्हाला सायंकाळी एकनाथ




शिंदे यांच्या नंदनवन बंगल्यावर बोलावण्यात आले होते, त्यानुसार आम्ही तिथे भेट दिली. शिवसेनेतून लढण्याच्या प्रक्रियेनुसार पक्षप्रवेश व अइ फॉर्म वाटप, दोन्ही एकत्र होणार होते.

तिथे गेल्यावर काही काळ आमची चर्चा झाली व निर्णय घेण्यासाठी मी काही वेळ मागून घेतला. मी व माझ्यासोबत असलेले अनेक कार्यकर्ते घेऊन तिथून रात्री उशिरा आम्ही पुन्हा दादर कार्यालयात परतलो. माझ्यासोबत असलेल्या कार्यकर्त्यांशी चर्चा केल्यानंतर सर्वानुमते असे ठरवले की वरिष्ठांची परवानगी असली तरी एका निवडणुकीसाठी मागील दहा वर्षांचे पक्षातील कार्य, हिंदुत्वासाठी सुरू असलेला लढा आणि भाजपा परिवार यांच्यापासून दूर व्हायचे नाही, लढायचे असेल तर कमळ चिन्हावर लढायचे. मात्र याबाबत मान्यता न मिळाल्याने मी सदर सीट न लढवण्याचा निर्णय घेतला.

माझ्यावर दृढ विश्वास दाखवणाऱ्या मा.एकनाथजी शिंदे, आमच्या पक्षाचे वरिष्ठ नेते, तसेच मला साथ देणारे माझे सर्व सहकारी, माझ्यावर शुभेच्छा व आशीर्वादाचा वर्षाव करणाऱ्या सर्व हितचिंतकांचे मनापासूनआभार.

## ठाकरे बंधू अन महायुतीची चर्चा असताना काँग्रेसची स्मार्ट खेळी

**मुंबई :** काँग्रेसनं प्रकाश आंबेडकरांच्या वंचित बहुजन आघाडीशी घरोबा केला आहे. तर अजित पवारांची राष्ट्रवादी काँग्रेस स्वबळावर लढत आहे. महायुती आणि ठाकरे बंधूंच्या युतीची सर्वाधिक चर्चा असताना काँग्रेसनं मोठी खेळी केली आहे. त्यामुळे वंचित बहुजन आघाडीची मोठी गोची झाली आहे.२०१७ मध्ये मुंबई महापालिकेची अखेरची निवडणूक झाली. त्यात काँग्रेसनं ३१ जागा जिंकल्या होत्या. शिवसेना आणि भाजप स्वबळावर लढले. अनेक प्रभागांमध्ये याच दोन पक्षांमध्ये थेट लढत झाली. त्यामुळे बऱ्याच प्रभागांमध्ये काँग्रेसचे उमेदवार स्पर्धेतही नव्हते. तब्बल ६२ प्रभागांमध्ये काँग्रेसचा मोठा पराभव झाला. आता त्याच ६२ जागा काँग्रेसनं वंचितला दिल्याची माहिती समोर आली आहे. लोकमतनं याबद्दलचं वृत्त दिलं आहे. वंचित २० विशिष्ट जागा हव्याच होत्या. मात्र यातील काही जागा काँग्रेसनं त्यांना सोडलेल्या नाहीत. काँग्रेसनं वंचितला ६२ जागा सोडल्या आहेत. यातील एका जागेचा अपवाद वगळता अन्य सगळ्याच



जागांवर काँग्रेस गेल्या निवडणुकीत तिसऱ्यापासून आठव्या क्रमांकावर फ कली गेली होती. २०१७ मध्ये प्रकाश आंबेडकरांच्या वंचितनं ७ जागा लढवल्या होत्या. त्यावेळी वंचितचं नाव भारतीय रिपब्लिकन पक्ष असं होतं. भारिपला एकाही प्रभागात हजारपेक्षा अधिक मतं घेता आली नव्हती. भारिप उमेदवारांचा दारुण पराभव झाला होता.२०१७ मध्ये काँग्रेसनं मुंबईत ३१ जागा जिंकल्या. पण अनेक प्रभागांमध्ये काँग्रेसला मोठा फटका बसला. विजयी उमेदवार आणि काँग्रेसचे पराभूत उमेदवार यांना मिळालेल्या मतांम ध्ये खूप अंतर होतं. प्रभाग क्रमांक ११४ मध्ये तर काँग्रेसचा उमेदवार थेट आठव्या स्थानावर फेकला गेला होता. तर अन्य एका प्रभागात काँग्रेसचा उमेदवार सातव्या स्थानी होता.

## माजी नगरसेवकानं ठाकरेंची साथ सोडली

**मुंबई :** माजी नगरसेवक अनिल कोकीळ यांनी उद्धव ठाकरें'ची साथ सोडत शिंदेसेनेत प्रवेश केल्यानं ज्येष्ठ शिवसैनिकानं संताप व्यक्त केला. शिवसेना उबाठाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी उमेदवारी नाकारल्यानं अनिल कोकीळ यांनी ठाकरेंची साथ सोडत शिंदेसेनेची वाट धरली. आज त्यांनी शिंदेसेनेत प्रवेश केला. त्यानंतर प्रभागातील ज्येष्ठ शिवसैनिकानं कोकीळ यांनी दिलेली बॅग आणि साहित्याची होळी केली.प्रभाग क्रमांक २०४ मधून उद्धव ठाकरेंनी अनिल कोकीळ यांना उमेदवारी नाकारली. त्यानंतर कोकीळ यांनी शिंदेसेनेत प्रवेश केला. यानंतर ज्येष्ठ शिवसैनिक संजय गुरव यांनी संताप व्यक्त केला. कोकीळ यांनी दिलेली बॅग त्यांनी पेटवून दिली. गद्दाराला हाकलून द्या, त्याला कुठेही उभा करु नका, अशा शब्दांत संजय गुरव यांनी त्यांचा संताप व्यक्त केला.गद्दार माणसाला कधीही जवळ करु नका. शिवसेनेसाठी त्यानं काम केलं होतं. पण आता तो काही उपयोगाचा नाही, अशा भावना ज्येष्ठ शिवसैनिकानं व्यक्त केल्या. त्या गद्दाराला तुम्ही हाकलून द्या. त्याला इथे उभा करु नका.

## शिवसेनेने १५ नावं दिली पण भाजपने वाचून चर्चाच बंद केली..

**पुणे :** भाजप-शिवसेना युतीच्या चर्चा या उमेदवारी अर्ज दाखल करण्याच्या शेवटच्या तासापर्यंत सुद्धा संपलेल्या नव्हत्या. शिवसेना पस्तीस ते चाळीस जागेची मागणी भाजपकडे करत होती. मात्र भाजप फक्त १५ जागा देण्यास तयार होते. यावरून बरेच दिवस चर्चेचे गुहाळ रंगल्यानंतर अखेर शिवसेनेकडून १३५ ते १४० उमेदवारांना अइ फॉर्म देण्यात आले आहेत. मात्र भाजप सेनेचं का बिनसलं याची अंदर की बात ही वेगळीच असल्याचं आता स्पष्ट झालं आहे.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे २८ डिसेंबर रोजी शिवसेनेकडून १५ उमेदवारांची यादी देण्यात आली होती. पर्यायाने हीच यादी भाजपला पाठवण्यात आली होती. या यादीवर भाजप-सेनेच्या युतीचे भवितव्य अवलंबून होते. कारण भाजप सेनेला १५ जागा देण्यास तयार होते आणि ३५ जागा मागणारी शिवसेना सुद्धा २८ तारखेपर्यंत १५ जागेवर तयार झाली होती. त्यानुसार शिवसेनेकडून नीलम गोऱ्हे, विजय शिवतारे, रविंद्र धंगेकर, अजय भोसले, उल्हास तुपे, आबा बागुल



यांनी एक १५ उमेदवारांची तयार केली. पण याच यादी मुळे भाजप-शिवसेनेत वाद विकोपाला गेला.या यादीमध्ये प्रभाग क्रम ांक ४१ ब मधून प्रमोद नाना भानगिरे, ४१ क स्वाती अनंत टकले, २४ ड प्रणव रवींद्र धंगेकर, २३ क प्रतिभा रवींद्र धंगेकर, २६ ड उल्हास उर्फ वसंतराव बागुल, ३७ क गिरीराज तानाजी सावंत, ३७ ड रूपाली रमेश कोंडे, ३८ क वनिता जालिंदर जांभळे, ३८ इ स्वराज नमेश बाबर, ३९ क मनिषा गणेश मोहिते, ६ ड आनंद रामनिवास गोयल, ३ क गायत्री हर्षवर्धन पवार, १६ ड उल्हास दत्तात्रय तुपे, ४० ड दशरथ पंढरीनाथ, काळभोर किंवा गंगाधर विठ्ठल बधे, ११ क वैशाली राजेंद्र मराठे यांचे नावं होती.पण या सगळ्या नावामधून प्रभाग क्रमांक २४ ड हे मूळ वादाचे कारण ठरले.

## आमदाराचा मुलगा आणि सून भाजपच्या तिकिटावर निवडणुकीच्या रिंगणात

**पुणे :** पुणे महानगरपालिका निवडणुकीसाठी आज उमेदवारी अर्ज दाखल करण्याचा शेवटचा दिवस होता. त्यामुळे शहरात निवडणुकीच्या रिंगणात उतरलेल्या चेहऱ्यांपैकी अनेक नवे चेहरे समोर आले आहेत. यामध्ये शहराच्या राजकारणात विशेष लक्ष वेधून घेतल आहे ते वडगाव शेरी विधानसभा मतदारसंघाने. या विधानसभा मतदारसंघात राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे बापूसाहेब पठारे हे आमदार आहेत. बापूसाहेब पठारे हे जरी शरद पवारांच्या पक्षात असले तरी त्यांच्या कुटुंबाने मात्र कमळ हाती घेतलं आहे.बापूसाहेब पठारे यांचे सुपुत्र सुरेंद्र पठारे यांनी काही दिवसांपूर्वी भाजपमध्ये प्रवेश केला होता. मात्र प्रत्यक्षात उम दवारी अर्ज दाखल केल्यानंतर सुरेंद्र पठारे यांच्या सोबत त्यांच्या पत्नी ऐश्वर्या पठारे या देखील भारतीय जनता पक्षाच्या तिकिटावर निवडणूक लढवणार असल्याचं समोर आलं आहे. ऐश्वर्या पठारे या प्रभाग क्रमांक तीनमधून निवडणूक लढवत आहेत. तर सुरेंद्र पठारे हे प्रभाग क्रमांक चारमधून निवडणुकीच्या रिंगणात उतरले आहेत. त्यामुळे शरद पवारांच्या आमदारांच्या घरातच त्यांचा मुलगा आणि सून हे भाजपच्या तिकिटावर निवडणूक लढवत असल्याने शहराच्या राजकारणात याची विशेष चर्चा रंगली आहे.आगामी महानगरपालिका निवडणुकीच्या



पार्श्वभूमीवर वडगाव शेरी मतदारसंघातून एक नवी आणि सकारात्मक राजकीय समीकरणे समोर आली आहेत. भारतीय जनता पक्षाने पूर्व पुण्यातून सुरेंद्र पठारे आणि ऐश्वर्या पठारे या दाम्पत्याला निवडणुकीच्या रिंगणात उतरवले आहे. या निर्णयामुळे 'टीम देवेंद्र'ला पूर्व पुण्यात एक नवा युवा चेहरा मिळाल्याची चर्चा रंगली आहे.पुण्याच्या प्रतिष्ठित 'सीओईपी' (उजएझ) अभियांत्रिकी महाविद्यालयाचे गोल्ड मेडलिस्ट असलेले सुरेंद्र पठारे यांनी अलीकडेच प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या उपस्थितीत भाजपमध्ये प्रवेश केला होता. आता त्यांना प्रभाग क्रमांक चार मधून त्यांना उमेदवारी देण्यात आली आहे. पक्षाच्या वरिष्ठ नेतृत्वाचा विश्वास आणि तरुणांमधील त्यांची लोकप्रियता यामुळे वडगाव शेरीतील निवडणुकीत भाजपची ताकद वाढल्याचे मानले जात आहे.दुसरीकडे, प्रभाग क्रमांक तीनमधून ऐश्वर्या पठारे यांनी आपली उमेदवारी जाहीर केली आहे. केवळ एक राजकारणी म्हणूनच नव्हे, तर उद्योजिका आणि सामाजिक कार्यकर्त्या म्हणून त्यांची ओळख आहे. त्यांना २०१४ चा 'महाराष्ट्र शासन युवा पुरस्कार' आणि २०२२ चा 'फायनान्शियल टाइम्स बिझनेस अवॉर्ड' मिळाला आहे. 'सखी प्रेरणा मंच'च्या माध्यमातून त्यांनी महिला सक्षमीकरणाचे मोठे जाळे विणले आहे.पूर्व पुण्यात सहसा पारंपरिक राजकारण पाहायला मिळते. मात्र यावेळी भाजपने एका बाजूला तंत्रज्ञानाची जोड असलेले सुरेंद्र पठारे आणि दुसऱ्या बाजूला सामाजिक भान असलेल्या ऐश्वर्या पठारे यांना संधी देऊन निवडणुकीत रंगत आणली आहे. वडगाव शेरीतील मतदारांचा ओढा आता या उच्चशिक्षित आणि नव्या जोमाच्या नेतृत्वाकडे वळणार का? हे पाहणे आता औत्सुक्याचे ठरेल.

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# मंगेश काळोखे हत्याकांडात 'बीड' कनेक्शन!

**रायगड :** खोपोली शहरातील शिवसेना कार्यकर्ते मंगेश काळोखे यांच्या निर्घृण हत्येप्रकरणाने संपूर्ण रायगड जिल्हा हादरून गेला असून या प्रकरणाला आता बीड जिल्ह्याचे कनेक्शन असल्याचा गंभीर आरोप आमदार महेंद्र थोरवे यांनी केला आहे. मंगेश काळोखे यांच्यावर धारदार शस्त्राने तब्बल १३ वार करून त्यांची हत्या करण्यात आली होती. हा हल्ला अचानक नसून तो पूर्णपणे पूर्वनियोजित कटातून करण्यात आल्याचा संशय दिवसेंदिवस बळावत आहे. या खळबळजनक प्रकरणात आतापर्यंत खोपोली पोलिसांनी नऊ आरोपींना अटक केली असून न्यायालयाने सर्व आरोपींना ५ तारखेपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे. तपासादरम्यान अनेक महत्वाचे धागेदोरे समोर येत असून आरोपींमधील परस्पर



संबंध, फोन कॉल्स, हालचाली आणि आर्थिक व्यवहार तपासले जात आहेत. दरम्यान, आमदार महेंद्र थोरवे यांनी या हत्येमागे मोठे षडयंत्र असल्याचा आरोप करत खळबळ उडवून दिली आहे. त्यांनी सांगितले की, या गुन्ह्यात बीड जिल्ह्यातील एक कुख्यात गुन्हेगार थेट सहभागी आहे. संबंधित आरोपी हा बीडमध्ये वॉन्टेड असतानाही रवी देवकर याने त्याला मुद्दाम खोपोलीत आणले आणि मंगेश काळोखे यांना संपवण्याचा कट रचण्यात आला, असा गंभीर आरोप आमदार थोरवे यांनी केला आहे.या हत्येप्रकरणाचा संबंध वाल्मिक कराडशी आहे का? याबाबतही चर्चा सुरू असून यामुळे प्रकरणाला आणखी वेगळे वळण मिळाले आहे. मात्र या संदर्भात पोलिसांकडून अधिकृत दुजोरा देण्यात आलेला नाही. पोलिसांकडून सखोल तपास सुरू असून फरार आरोपींचा शोध घेण्यासाठी विशेष पथके तैनात करण्यात आली आहेत.मंगेश काळोखे हे शिवसेनेचे सक्रिय कार्यकर्ते होते. त्यांच्या हत्येमुळे शिवसैनिकांमध्ये तीव्र संतापाची लाट उसळली आहे. ङ्गहा खून केवळ एका कार्यकर्त्याचा नसून संपूर्ण शिवसेनेवर झालेला हल्ला आहे,ङ्घ असे म्हणत आम दार महेंद्र थोरवे यांनी खोपोली शहर व कर्जत मतदारसंघातील शिवसैनिक एकत्र येऊन न्यायासाठी कँडल मार्च काढणार असल्याची घोषणा केली आहे.

दरम्यान, या घटनेमुळे खोपोली व कर्जत परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले असून नागरिकांकडूनही आरोपींना तातडीने अटक करून कठोर कारवाई करण्याची मागणी होत आहे. कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी पोलिसांनी बंदोबस्त वाढवला आहे.

मंगेश काळोखे हत्या प्रकरणाचा तपास कोणत्या दिशेने जातो, बीड कनेक्शन आणि कथित मास्टरमाइंड कोण, याकडे आता संपूर्ण रायगड जिल्ह्याचे लक्ष लागले असून या प्रकरणाचे पडसाद येत्या काही दिवसांत आणखी तीव्र होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

## शिवसेनेतर्फे धर्मसभा ; सोन्याच्या दागिन्यांवर डल्ला, १३ महिला

**मिरा-भाईंदर :** मिरा-भाईंदरमध्ये आयोजित प्रसिद्ध प्रवचनकार पंडित प्रदीप मिश्रा यांच्या सनातन धर्मसभेला चोरट्यांच्या टोळीने लक्ष्य केले असून, भाविकांचे लाखो रुपये किमतीचे सोन्याचे दागिने लंपास केल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. विशेष म्हणजे, ज्या ठिकाणी हजारो भाविकांची सुरक्षा म हत्वाची होती, त्याच परिसरात चोरट्यांनी उच्छाद मांडल्याने नागरिकांमध्ये संतापाचे वातावरण आहे. या प्रकरणी काशिगाव पोलिस ठाण्यात गुन्ह्यांची नोंद करण्यात आली असून पोलिसांनी तपासाची चक्रे वेगाने फिरवली आहेत.मिरा-भाईदरच्या हटकेश भागात २४ ते २८ डिसेंबर दरम्यान शिवसेना शिंदे गटाच्या वतीने या भव्य प्रवचन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. आगामी महानगरपालिका निवडणुका डोळ्यासमोर ठेवून, आध्यात्मि क माध्यमातून मतदारांपर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न या कार्यक्रमाच्या निमित्ताने शिवसेनेच्या स्थानिक पदाधिकाऱ्यांनी केला होता. या कार्यक्रमासाठी केवळ शहरच नव्हे, तर संपूर्ण राज्यभरातून हजारो भाविकांची गर्दी उसळली होती. कार्यक्रमाच्या सांगतेनंतर लगतच्या नवीन जीसीसी हॉटेल जवळील बस स्टॉपवर बस पकडण्यासाठी भाविकांची



मोठी झुंबड उडाली होती. याच गर्दीचा फायदा घेत चोरट्यांनी महिलांच्या गळ्यातील चेन आणि इतर दागिन्यांवर डल्ला मारला. शुक्रवारपासून सलग तीन दिवस दागिन्यांच्या चोरीचे सत्र सुरू होते. धक्काबुक्की आणि गोंधळाचा फायदा घेत अज्ञात महिलांच्या टोळीने हे कृत्य केल्याचे प्राथमिक तपासात निष्पन्न झाले आहे.नागरिकांनी तक्रार दाखल केल्यानंतर पोलिसांनी १३ संशयित महिलांना ताब्यात घेतले आहे. मात्र, एकीकडे सोन्याचे भाव गगनाला भिडलेले असताना (सुमारे ८० हजार रुपये प्रति तोळा), पोलिसांनी १० ग्रॅम सोन्याची किंमत एफआयआरमध्ये अवघी २० हजार रुपये दर्शवल्याने आश्चर्य व्यक्त केले जात आहे. पोलिसांच्या या भूमिकेवर तक्रारदारांनी नाराजी व्यक्त केली आहे. काशिगाव पोलिसांच्या माहितीनुसार, अद्याप अनेक भाविकांचे दागिने चोरीला गेल्याचा अंदाज असून तक्रारी येण्याचे सत्र सुरूच आहे.

## तडीपार गुंडाने केला मोठा कांड

**पुणे :** पिंपरी-चिंचवड पोलिस आयुक्तालयाच्या हद्दीसह पुणे जिल्ह्यातून दोन वर्षांसाठी तडीपार केलेला गुंड पोलिसांच्या नाकावर टिच्चून शहरात आला आणि त्याने महिलेवर बलात्कार केला. तडीपार केलेल्या आरोपीवर लक्ष ठेवण्याची जबाबदारी असलेल्या पोलिस अंमलदाराला या प्रकरणी निलंबित करण्यात आले आहे.फारुख सत्तार शेख (वय २५, रा. बालाजीनगर, भोसरी एम आयडीसी) असे आरोपीचे नाव आहे. फारुख पोलिस रेकॉर्डवरील गुन्हेगार आहे. त्याचे मूळ वास्तव्य एमआयडीसी भोसरी पोलिस ठाण्याच्या हद्दीत बालाजीनगर झोपडपट्टी येथे आहे. तो सध्या आळंदी पोलिस ठाण्याच्या हद्दीत चिंबळी फाटा येथे राहत होता. त्याला पिंपरी-चिंचवड पोलिसांनी आठ एप्रिल २०२४ मध्ये पिंपरी-चिंचवड पोलिस आयुक्तालयाच्या हद्दीसह पुणे जिल्ह्यातून दोन वर्षांसाठी तडीपार केले आहे.फारुख सत्तार शेख (वय २५, रा. बालाजीनगर, भोसरी एम आयडीसी) असे आरोपीचे नाव आहे. फारुख पोलिस रेकॉर्डवरील गुन्हेगार आहे. त्याचे मूळ वास्तव्य एमआयडीसी भोसरी पोलिस ठाण्याच्या हद्दीत बालाजीनगर झोपडपट्टी येथे आहे. तो सध्या आळंदी पोलिस ठाण्याच्या हद्दीत चिंबळी फाटा येथे राहत होता.

## बहिणीच्या घराला कुलूप, भावाला संशय, दार उघडताच धक्का बसला

**कानपूर :** एका व्यक्तीने आपल्या दुसऱ्या पत्नीची निर्घृण हत्या केल्याची घटना घडली आहे. कानपूरच्या रेवना परिसरात एक धक्कादायक घटना घडल्याची माहिती आहे. याप्रकरणी पोलिसांनी सांगितले की, मृत रोशनीचे लग्न सुमारे एक वर्षापूर्वी संजय कुमारशी झाले होते. संजयचे हे दुसरे लग्न होते. त्याच्या पहिल्या पत्नीने त्याच्या छळामुळे आपल्या आयुष्याची अखेर केली होती. संजयला त्याच कारणामुळे तुरुंगात टाकण्यात आले होते. सुटकेनंतर त्याने रोशनीशी लग्न केले.याप्रकरणाच्या माहितीनुसार, रोशनीचा भाऊ राहुल त्याच्या बहिणीला भेटायला गेला होता कारण ती त्याचा फोन उचलत नव्हती. तो पोहोचला तेव्हा दाराला कुलूप होते. राहुलने नातेवाईकांना आणि पोलिसांना माहिती दिली. पोलिसांनी घटनास्थळी पोहोचून तपास केला. दार उघडताच त्यांना रोशनीचा मृतदेह दिसून आला. रोशनीला फ्राईंग पॅनने मारहाण करण्यात आली होती, ज्यामुळे तिला गंभीर दुखापत झाली होती.रोशनीच्या काकांनी दिलेल्या माहितीनुसार, संजय लग्नापासूनच त्याच्या पत्नीचा छळ करत होता. संजयचे आधी लग्न झाले होते आणि त्याच्या पहिल्या पत्नीने आपल्या आयुष्याची अखेरही केली होती. त्यांना एक मुलगी देखील होती.



रोशनी अनेकदा तिच्या भावाच्या घरी राहायला जायची. चार दिवसांपूर्वी संजय रोशनीला भेटायला गेला आणि तिला सोबत जाण्याचा आग्रह केला. संजयने रोशनीला सांगितलं की, तो तिच्यासोबत राहू इच्छितो. राहुलने त्याच्या बहिणीला तिच्या पतीसोबत राहण्यासाठी जाऊ दिले, परंतु चार दिवसांनंतर संजयने तिची निर्घृण हत्या केली.या घटनेबाबत डीसीपी डीएन चौधरी यांनी सांगितले की, हत्येचा आरोपी संजय फरार आहे. त्याचा शोध सुरू आहे. परिसरातील लोकांनीही त्याला पळून जाताना पाहिले आहे. रोशनीच्या भावाच्या तक्रारीवरून पोलिसांनी हत्येचा गुन्हा दाखल केला आहे आणि आरोपीला अटक करण्यासाठी पथकं रवाना करण्यात आली आहेत. फरार आरोपीला पकडण्यासाठी सीसीटीव्ही फुटेजही स्कॅन केले जात आहे. शेजाऱ्यांनी सांगितलं की, संजय अनेकदा रोशनीला त्रास देत असे. पोलिस या प्रकरणाचा तपास करत आहेत.

## दशाश्वमेध घाटावर शिवीगाळ, जपानी कुटुंबाचा हात जोडून माफीनामा

**वाराणसी :** २५ डिसेंबर रोजी आपल्या कुटुंबासोबत वाराणसीला भेट देणाऱ्या जपानी पर्यटकांच्या एका ग्रुपला दशाश्वमेध घाटाजवळ कडवट विरोधाचा सामना करावा लागला. ऑनलाइन व्हायरल झालेल्या एका व्हिडिओमध्ये संबंधित जपानी कुटुंब शांतपणे, कोणताही वाद न घालता उभे असल्याचे दिसते, तर जमावाकडून पर्यटकांना शिवीगाळ केली जात असल्याचे दिसत आहे.व्हिडिओम ध्ये एक जपानी पर्यटक हात जोडून जमावाची माफी मागताना दिसत आहे. सांताक्लॉजची टोपी आणि लाल रंगाची स्विमसूट अंडरवेअर घातलेल्या पर्यटकाला धमकावण्यात आले, शिवीगाळ करण्यात आली आणि अखेरीस घाटावरुन



हाकलून देण्यात आले. प्रत्यक्षदर्शींनी सांगितले की परिस्थिती जवळपास शारीरिक हाणामारीपर्यंत पोहोचली होती. मिळालेल्या माहितीनुसार, गर्दीतील एका व्यक्तीने जपानी पर्यटकांनी गंगा नदीत लघवी केल्याचा खोटा आरोप केल्यानंतर हा प्रकार सुरु झाला. या दाव्याला दुजोरा देणारा कोणताही पुरावा नाही, तरीही या घटनेचा व्हिडिओ व्हायरल झाला. त्यामुळे सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणावर संताप व्यक्त केला जात आहे. स्थानिक रहिवाशांनीही जमावाच्या वर्तनाचा निषेध केला आहे. एका निराधार आरोपावरुन मैत्रीपूर्ण देशातील पर्यटकांना अशा प्रकारे वागणूक देणं हे 'पूर्णपणे अस्वीकार्य' असल्याचे म्हटले आहे.या व्हिडिओमुळे ऑनलाइन विश्वात तीव्र प्रतिक्रिया उमटल्या आहेत. 'अतिथी देवो भव' ही भावना अत्यंत महत्त्वाची मानल्या जाणाऱ्या शहरात असे गैरवर्तन झाल्याबद्दल नेटिझन्सनी आश्चर्य व्यक्त केले आहे. अनेकांनी असे नमूद केले की, जरी पर्यटकांनी काही चूक केली असती, तरी त्यांना अपमानित न करता ही परिस्थिती सौजन्याने हाताळता आली असती.अनेक सोशल मीडिया युजर्सनी या घटनेचा निषेध केला. एक्सवर एकाने लिहिले आहे, की ङ्गमी संबंधित पर्यटक आणि जपानी नागरिकांची सर्व भारतीयांच्या वतीने माफी मागतो. मोदींच्या बालेकिल्ल्यातील वाराणसीमध्ये जमावाची ही भयानक दहशत पाहाला मिळाली. अविश्वसनीय दृश्य आहेत ही. फक्त त्यांनी सांताक्लॉजच्या टोप्या आणि स्विमसूट घातले होते म्हणून? अशा कृत्यांमुळे भारतीयांविरुद्ध जागतिक वर्णद्वेष वाढतो आणि पर्यटन क्षेत्राचे नुकसान होते.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# ऑस्ट्रेलियन स्टार खेळाडूकडून भारतीय महिला संघाला ओपन चॅलेंज

**मुंबई :** भारतीय महिलांचा विश्वचषक २०२५ मध्ये रंगला. या स्पर्धेत भारतीय संघाची उल्लेखनीय कामगिरी केली होती. भारतीय संघाने एकदिवसीय विश्वचषकाच्या ट्रॉफीवर आपले नाव कोरले. प्रथमच भारतीय संघाने विश्वचषक जिंकला. सेमीफायलनमध्ये भारताने ऑस्ट्रेलियाचा पराभव केला होता आणि फायनलमध्ये दक्षिण आफ्रिकेचा पराभव केला होता. आता ऑस्ट्रेलियाला या पराभवाचा धक्का अजून पचवता आला नाही.ऑस्ट्रेलियाची स्टार अष्टपैलू खेळाडू ॲशले गार्डनरने आगामी मालिकेपूर्वी भारतीय संघाला इशारा दिला आहे. ती म्हणते की, माझा संघ विश्वचषक उपांत्य फेरीत पराभूत झाला असला तरी, तो अजूनही जगातील सर्वोत्तम संघ आहे.' २०२५ च्या महिला विश्वचषकाच्या उपांत्य फेरीत भारताने ऑस्ट्रेलियाचा पराभव केला, ज्यामुळे भारताचा पहिला विजेतेपदाचा विजय झाला. दोन्ही संघ फेब्रुवारी-मार्चमध्ये सर्व स्वरूपातील मालिकेत आमनेसामने येणार आहेत.ऑस्ट्रेलियाने सलग दोन विश्वचषक उपांत्य फेरीत पराभव पत्करला आहे. २०२४ च्या टी-२० विश्वचषकाच्या अंतिम चारमध्ये दक्षिण आफ्रिकेने त्यांना पराभूत केले. गार्डनर म्हणाली की, आमच्या संघाकडे अद्याप जेतेपद नसले तरी तो सर्वोत्तम संघ आहेत. पुढील मालिकेत आमचा संघ भारताचा सामना करेल तेव्हा ते जोरदार प्रत्युत्तर देतील. आमच्यावर अलिकडेच दबाव आला आहे. पण मी आत्म विश्वासाने म्हणू शकते की आम्ही जगातील सर्वोत्तम संघ आहोत.'ऑस्ट्रेलिया आणि भारत यांच्यात मालिका रंगणार आहे. यामध्ये तीन एकदिवसीय सामने, तीन टी-२० सामने आणि एक कसोटी सामना असेल. गार्डनर म्हणाली, 'भारतीय संघ खूप आत्मविश्वासाने येईल. आणि त्यांनी ते करायला हवे. त्यांनी अलीकडेच खूप चांगले क्रिकेट खेळले आहे. त्यांनी विश्वचषकापूर्वी एकदिवसीय मालिकेत आम्हाला आव्हान दिले आणि नंतर उपांत्य फेरी जिंकली. ऑस्ट्रेलियाला भारताविरुद्ध घरच्या मैदानावर खेळण्याचा फायदा होईल. ते येथे खेळण्यासाठी येत आहेत. आम्हाला आमच्या परिस्थिती त्यांच्यापेक्षा चांगल्या प्रकारे माहित आहेत. जर त्यांनी आम्हाला आव्हान दिले तर आम्हाला या परिस्थितीत काय करायचे हे माहित आहे.



# भारताने श्रीलंकेला धुळ चारतच मिळवला विजय..

**तिरुअनंतरपुरम :** भारताचा अर्धा संघ गारद झाला होता. भारताचा डाव गडगडणार, असे वाटत होते. पण त्याचवेळी संघासाठी धावून आली ती कर्णधार हरमनप्रीत कौर. भारताच्या डावाला हरमनप्रीत कौरने आपल्या अर्धशतकाच्या जोरावर सावरले. भारताने या सामन्यात १७५ धावा केल्या आणि श्रीलंकेला १६० धावांवर रोखत १५ धांवानी हा सामना जिंकला.स्मृती मानधनाच्या अनुपस्थितीत खेळणाऱ्या भारतीय संघाला यावेळी चांगली सुरुवात करता आली नाही. धडाकेबाज फलंदाज शेफाली वर्मा यावेळी फक्त पाच धावांवर बाद झाली. स्मृती मानधनाच्या जागी यावेळी गुनलन कामिलिनीला संधी देण्यात आली होती. पण कामिलिनीला यावेळी या संधीचे सोने करता आले नाही. कारण कामलिनीला यावेळी १२ धावाच करता आल्या, त्यानंतर फलंदाजीला आलेल्या हरलिन देओलही यावेळी ११ धावांवर बाद झाली. भारताचा डाव त्यावेळी अडचणीत आला होता. पण त्यावेळी भारताच्या मदतीला धावून आली ती कर्णधार हरमनप्रीत कौर.भारताची या सामन्यात ५ बाद ७१ अशी अवस्था झाली होती. त्यावेळी हरमनप्रीत कौरने अमनज्योतला साथीला घेतले आणि दमदार भागीदारी रचली. या दोघींनी मिळून सहाव्या विकेटसाठी ५१ धावा केल्या आणि त्यामुळे संघाला सन्मानजनक धावसंख्येपर्यंत पोहोचता आले. अमनज्योत यावेळी २१ धावांवर बाद झाली आणि ही जोडी फुटली. पण त्यानंतरही हरमनप्रीत कौर काही काळ संघाचा किल्ला लढवत होती. हरमनप्रीत कौरने यावेळी ४३ चेंडूंत ९ चौकार आणि एका षटकाराच्या जोरावर ६३ धावांची खेळी साकारली व भारताच्या डावाला चांगला आकार दिला. स्मृती बाद झाली तेव्हा भारताच्या १४२ धावा झाल्या होत्या, पण त्यानंतर अरुंधती रेड्डीने धडाकेबाज फकटेबाजी केली.



# गौतम गंभीर यांनी संजूला का केलं जवळ

**नवी दिल्ली :** गौतम गंभीर यांनी आता एक नवा गेम करायचं ठरवलं आहे आणि त्यासाठी त्यांनी संजू सॅमसनला जवळ करायचं ठरवलं आहे. काही दिवसांपूर्वी संजू संघात असूनही त्याला गौतम गंभीर संधी देत नव्हते, पण अचानक त्याच्याबाबतच प्रेम उफाळून आलं. संजूला थेट वर्ल्ड कपच्या संघात त्यांनी संधी दिली. पण ही संधी त्यांनी अशीच दिलेली नाही तर त्यामागे एका खेळाडूचा गेम करण्याचा प्लॅन गौतम गंभीर यांचा असल्याचे आता समोर येत आहे.गौतम गंभीर यांच्या डोक्यात नेमकं काय सुरु आहे, याचा अंदाज कोणालाही येणार नाही. कारण गंभीर यांनी सुरुवातीला हार्दिक पंड्याला टी २० संघाचे कर्णधार न बनवता सूर्याच्या हाती नेतृत्व सोपवले. त्यानंतर रोहित शर्माकडून कसोटी संघाचे कर्णधारपद काढून घेतले. रोहित शर्मा आणि विराट कोहली यांना कसोटी संघाम धून डच्चू दिला. रोहित शर्माने चॅम्पियन्स ट्रॉफी देशाला जिंकवून दिली होती, तर तरीही त्यानंतर कोणतेही कारण न देता त्याच्या वनडे संघाचे कर्णधारपद काढून घेतले. शुभमन गिलला त्यांनी कसोटी संघाचे कर्णधारपद दिले, त्यानंतर वनडे संघाच्या कर्णधारपदीही बसवले.

# ज्याच्यावर बॅन त्यालाच केला कॅप्टन

**मुंबई :** पुढील वर्षी होणाऱ्या टी-२० विश्वचषकाची स्पर्धा रंगणार आहे. या स्पर्धेसाठी भारताने आपला टी-२० संघ जाहीर केला आहे. शुभमन गिलला या संघातून वगळण्यात आले आहे. गिल हा आउट ऑफ फॉर्ममध्ये असल्यामुळे त्याला १५ सदस्यांच्या संघातही स्थान मिळाले नाही. आता टी-२० साठी इंग्लंडनेही आपला संघ जाहीर केला आहे. या संघाची धुरा या आयपीएलमधील बॅन असलेल्या खेळाडूकडे सोपवण्यात आली आहे.करीु ब्रूक नेतृत्वाखालील संघात १५ खेळाडूंचा समावेश आहे. आयपीएल २०२४ च्या आधी दिल्ली कॅपिटल्सने ब्रूकला ४ कोटी रुपयांना विकत घेतले होते, परंतु वैयक्तिक कारणांमुळे तो स्पर्धा सुरू होण्यापूर्वीच माघार घेत होता. बरोबर एक वर्षानंतर, आयपीएल २०२५ च्या मेगा लिलावात दिल्ली कॅपिटल्सने त्याला ६.२५ कोटी रुपयांना पुन्हा विकत घेतले. त्याने पुन्हा एकदा आयपीएलमधून माघार घेतली. बीसीसीआयने एक नवीन नियम लागू केला ज्यामुळे त्याच्यावर बंदी घालण्यात आली. अनेक फ्रँचायझींनी हंगाम सुरू होण्यापूर्वी परदेशी आणि देशांतर्गत खेळाडूंनी माघार घेतल्याची तक्रार केल्यानंतर हा नियम लागू करण्यात आला.लियाम लिव्हिंगस्टोनला संघातून



वगळल्यामुळे सर्वांनाच धक्का बसला आहे. मार्च २०२५ पासून आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून बाहेर आहे. त्याने शेवटचा फ ब्रुवारी २०२५ मध्ये टी-२० आंतरराष्ट्रीय सामन्यात इंग्लंडचे प्रतिनिधित्व केले होते, तो सामना तो भारताविरुद्ध खेळला होता. कर्णधार हॅरी ब्रूक हा मुख्य खेळाडू आहे. त्याच्याशिवाय फलंदाजीची धुरा बेन डकेट, विल जॅक्स, फिल साल्ट आणि टॉम बँटन यांच्या खांद्यावर असेल. जोफ्रा आर्चर संघाच्या वेगवान आक्रमणाचे नेतृत्व करेल, तर आदिल रशीद फिरकी विभागात एक महत्त्वाचा खेळाडू असेल. २०२६ चा टी-२० विश्वचषक ७ फेब्रुवारीपासून सुरू होईल आणि ८ मार्चपर्यंत खेळला जाईल. या स्पर्धेसाठी सर्व २० संघांना पाच गटांमध्ये विभागण्यात आले आहे. इंग्लंड बांगलादेश, इटली, वेस्ट इंडिज आणि नेपाळसह गट क मध्ये आहे.

# सिद्धार्थ मंडळ, संघर्ष मंडळ, डॉन बॉस्को यांची विजयी सलामी

**मुंबई :** सिद्धार्थ मंडळ, संघर्ष मंडळ, डॉन बॉस्को यांनी अमरहिंद मंडळ आयोजित 'स्व. उमेश शेनॉय चषक' राज्यस्तरीय कुमार कबड्डी स्पर्धेत विजयी सलामी दिली. मुंबईतील दादर (प.)येथील मंडळाच्या पटांगणावर पहिल्या दिवशी झालेल्या ड गटातील चुरशीच्या सामन्यात मुंबई शहरच्या विजय क्लबने ठाण्याच्या श्री स्वामी समर्थ मंडळा ३६-३६ असे बरोबरीत रोखले. राजेश गुप्ता, अमेय खांडेकर, शिवम यादव यांनी विजय कडून, तर विवेक शिंदे, रमेश विश्वकर्मा श्री स्वामी समर्थ कडून उत्कृष्ट खेळले. फ गटात ठाण्याच्या डॉन बॉस्कोने जिनसिंग, मयुरेश वाघ, राज सोनावणे, ध्रुव लोखंडे यांच्या चढाई पकडीच्या सर्वोत्तम खेळाच्या जोरावर मुंबई शहरच्या आकांक्षा मंडळावर ४७-२९ अशी सहज मात करीत साखळीत पहिल्या विजयाची नोंद केली. आकांक्षाचे साहिल मिसाळ, नूरलम शेख यांचा आज प्रभाव पडला नसल्याचे या सामन्यात पाहायला



मिळाले.मुंबई शहरच्या गुड मॉर्निंग स्पोर्टसब ने क गटात गटात आज सलग २ विजय मिळिवले. प्रथम त्यांनी उपनगरच्या श्री सिद्धिविनायक मंडळाला ३५-३० असे तर त्यानंतर झालेल्या सामन्यात मुंबई शहरच्या गोल्फदेवीला ४८-४० असे पराभूत करीत बाद फेरी गाठली. विवेक गवळी, आयुष पवार, दिवेश गवळी, विनय बंबोरे यांच्या चढाई पकडीच्या चतुरस्त्र खेळाने ही किमया साधली. रत्नागिरीच्या संघर्ष मंडळाने ड गटात पालघरच्या इच्छाशक्ती मंडळाला ४५-३४ असे नमविले. शैलेश रोडगे, रोशन चिपळूणकर, शुभम नवरंग यांच्या उत्कृष्ट खेळाला या विजयाचे श्रेय जाते. आदित्य मोरया, राज सिंग यांचा खेळ इच्छाशक्तीचा पराभव टाळण्यात कमी पडला.उपनगरच्या सिद्धार्थ मंडळाने ब गटात मुंबई शहरच्या नवोदित मंडळाला ५३-५२ असे चकवीत आगेकूच केली. नरेश चव्हाण, संकेत यादव अमरराज यांनी सिद्धार्थ कडून, तर अर्जुन कोकर, रजत मुलाणी यांनी नवोदित कडून उत्तम खेळ केला.

अलोक दिवेदी, निलेश सिन्हा, शिरीष माऊली, विक्रम महापात्रा, संजय तिवारी, विजयकुमार पाल आदी मान्यवाराच्या उपस्थितीत या स्पर्धेचा शुभारंभ करण्यात आला.

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# रणवीरसोबतच्या सीनवर अभिनेत्याची प्रतिक्रिया

**मुंबई :** रणवीर सिंगचा स्पाय-थ्रिलर ' धुरंधर ' हा चित्रपट प्रदर्शित झाल्यानंतर २६ दिवसांनीही बॉक्स ऑफिसवर धुमाकूळ घालत आहे. चित्रपटात अनेक भूमिका असून लुल्ली डकैतची भूमिका वेगळी आहे. नसीम मुघलने लुल्ली डकैतची भूमिका साकारली असून तो चित्रपटाच्या सुरुवातीला हमजा अली म जारीची छेड करतो आणि त्याच्या गुप्तांगांना स्पर्श करतो. आता, नसीमने खुलासा केला आहे की, त्याने सुरुवातीला हा सीन करण्यास नकार दिला होता. फिल्मीयानाला दिलेल्या मुलाखतीत, नसीम मुघलने 'धुरंधर' मधील त्याच्या भूमिकेबद्दल भाष्य केलं. रणवीर सिंगसोबतच्या त्याच्या व्हायरल सीनबद्दल तो म्हणाला, 'मी त्या सीनबद्दल काय बोलू... तो क्षण खरोखरच धक्कादायक होता. जेव्हा मला पहिल्यांदा त्या सीनबद्दल सांगितलं गेलं, तेव्हा मी नकार दिलेला.'नसीम मुघल पुढे म्हणाला की, सीन वाचल्यानंतर तो सुरुवातीला घाबरला होता, परंतु नंतर





रणवीर सिंगने त्याला समजावलं. नसीम म्हणाला, 'हे माझ्यासाठी शक्य झालं नसतं, कारण तो सीन अनेक वेळा वाचल्यानंतर मी खूप घाबरलो होतो. खरं सांगायचं तर, मी रणवीर सरांचा खूप मोठा चाहता आहे. त्यांची एनर्जी, विशेषतः पद्मावतपासून, नेहमीच उल्लेखनीय राहिली आहे. माझ्या मनात काहीतरी विचार येत होता, 'तो इतका मोठा स्टार आहे, मी त्याच्यासमोर हा सीन कसा करू शकेन?' रणवीर सरांनी मला फोन केला आणि ते माझ्याशी बोललेअभिनेत्याने खुलासा केला की, रणवीर सिंगसोबतचा त्याचा व्हायरल सीन दोन टेकमध्ये शूट करण्यात आला होता. अभिनेता म्हणाला, 'पहिल्या टेकमध्ये, जे पात्र कामुक आणि क्रूर असायला हवं होतं, ते थोडं जास्त क्रूर झालं. म्हणून आम्ही दुसऱ्या टेकमध्ये ते थोडं कमी केलं.'माझ्या कामाबद्दल मला जे प्रेम आणि कौतुक मिळतंय, ते धुरंधरच्या टीममुळे शक्य झालंय. मी बऱ्याच काळापासून अशा क्षणाची वाट पाहतोय. गेल्या १३ वर्षांपासून, मी माझ्या आयुष्यातील या क्षणाची वाट पाहत आहे, तो कधी येईल याची वाट पाहत होतो', असं नसीमने पुढे सांगितलं.




## साईराजची मोठ्या पडद्यावर वर्णी


**मुंबई :** छोट्या पडद्यावरून मोठ्या पडद्यावर काम करायला मिळणं हे प्रत्येक कलाकाराचं स्वप्न असतं. त्यासाठी तो कलाकार खूप कष्ट करतो. काहींना यश मिळतं, तर काहींना अपयश. आता बाल कलाकार साईराज केंद्रेला मोठ्या पडद्यावर झळकण्याची संधी मिळाली आहे. साईराज, त्याच्या आगामी मराठी सिनेमातून प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे.

बाल कलाकार साईराज केंद्रेला 'आम च्या पप्पांनी गणपती आणला' या गाण्यातून लोकप्रियता मिळाली. या गाण्यावर अनेकांनी रील्स बनवले. साईराजच्या हावभावांनी प्रेक्षकांचं मन जिंकलं. या गाण्यामुळे व्हायरल झाल्यानंतर साईराजनं 'झी मराठी' वाहिनीवरील, 'अप्पी आमची कलेक्टर' या मालिकेमध्ये सिंबा

## 'मला कोणताही पश्चात्ताप नाही'

**मुंबई :** बॉलिवूड अभिनेत्री मलायका अरोरानं १९९८ मध्ये अरबाज खानसोबत लग्न केलं. पण, १९ वर्षांच्या लग्नानंतर मलायकानं अभिनेत्याला घटस्फोट दिला. आता, मलायका पुन्हा एकदा तिच्या घटस्फोटाबद्दल स्पष्टपणे बोलली आहे. अभिनेत्रीनं खुलासा केला की, तिच्या स्वतःच्या कुटुंबानं आणि मित्रांनी तिच्या घटस्फोटाच्या निर्णयावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले होते. पण, मलायकाने सांगितलं की, तिला तिच्या निर्णयाबद्दल कोणताही पश्चात्ताप नाहीइंडिया टुडेला दिलेल्या अलिकडच्या मुलाखतीत, मलायका अरोराने अरबाज खानशीसोबतच्या घटस्फोटाबद्दल भाष्य केलं आहे. मलायका म्हणाली की, 'मला फक्त चाहत्यांकडूनच नव्हे तर माझ्या मित्रांकडून आणि कुटुंबाकडूनही खूप टीका आणि विरोध सहन करावा लागला. त्यावेळी माझ्या सर्व निर्णयांवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले गेले. तरीही, मी माझ्या





निर्णयावर ठाम राहिले, याचा मला आनंद आहे. मला कोणताही पश्चात्ताप नाही.'मलायका अरोरा पुढे म्हणाली, 'मला माहित नव्हतं की, माझ्यासाठी काय आहे. पुढे काय होईल हे मला माहित नव्हतं. पण त्यावेळी मला माहित होतं की, मला माझ्या आयुष्यात हे पाऊल उचलावं लागेल. मला वाटलं की, माझ्यासाठी आनंदी राहणं महत्वाचं आहे. कोणीही ते समजत नाही, ते म्हणायचे, 'तू तुझ्या आनंदाला कसं पहिलं प्राधान्य देऊ शकतेस' पण मी अविवाहित राहून आनंदी होते. मलायका अरोरा पुढे म्हणाली, 'मी लग्नावर विश्वास ठेवते, पण याचा अर्थ असा नाही की ते माझ्यासाठी आहे. जर ते टिकलं तर ते खूप छान आहे. मी खूप समाधानी आहे. माझं लग्न झालेलं, नंतर मी पुढे गेले. मी रिलेशनशिपमध्ये होते, पण मी नाराज नाही. मला अजूनही माझं आयुष्य आवडतं. मला प्रेमाची कल्पना आवडते.'मलायका पुढे म्हणाली की, 'मला प्रेम आवडतं. पण, मी ते शोधत नाही.

# मी आज पुन्हा मालिकेत, पण माझ्याशी वाद घातलेल्यापैकी एकही जण..

**मुंबई :** ही मालिका मी कधी सोडेन असं मला तेव्हाही वाटलं नव्हतं. पण काही कारणास्तव मला बाहेर पडावं लागलं. मी पुन्हा त्या मालिकेशी जोडली जाईन का, हे मला माहीत नव्हतं; किंबहुना मला तिथे परत जायचंही नव्हतं. कारण आपण प्रमाणिकपणे प्रेक्षकांना हसवण्याचा प्रयत्न करत असतो; पण त्याला काही लोकांमुळे गालबोट लागतं आणि मग पुन्हा ते काम करण्याची इच्छा होत नाही. माझं या मालिकेकडे पुन्हा वळण्याचं कारण म्हणजे त्याचे लेखक मनोज संतोषी. अंगुरी भाभी या व्यक्तिरेखेला त्यांनी जन्म दिला. ही मालिका सुरू राहावी, अशी त्यांची इच्छा होती. ते मला नेहमी मालिकेत पुन्हा येण्याबाबत विचारायचे. मीही त्यांना 'आपण दुसरा एखादा शो एकत्र करू या' असं म्हणायचे. यावर्षी त्यांचं निधन झालं. केवळ त्यांच्यासाठी आणि प्रेक्षकांसाठी मी त्या मालिकेकडे वळले. पुन्हा एकदा 'भाभीजी...'शी जोडले गेल्याचा आनंद आहे.नव्या सीझनमधील कथानकातच बऱ्याच गोष्टी बदलल्या आहेत. त्यामुळे जुन्या गोष्टी तर असतीलच, त्याच्या जोडीला काहीतरी नवीन, वेगळं देण्याचाही आमचा प्रयत्न आहे.आमच्या मालिकेच्या सेटवर तीन-चार कॅम ेऱ्यांचा सेटअप असतो; त्यामुळे कमी वेळात जास्त काम होतं. योग्य नियोजन असल्यामुळे चित्रीकरण लांबतही नाही. पण इतर काही मालिकांच्या बाबतीत तसं होताना दिसत नाही. आता शनिवार-रविवारसुद्धा मालिका दाखवल्या जातात. त्या अनुषंगानं त्यांना खूप काम करावं लागतं. लोक फक्त पैशांच्या मागे धावत आहेत. याला फक्त निर्माते जबाबदार नाहीत. कारण त्यांच्यावरही वाहिनी असते. त्यामुळे वाहिन्यांनीही याकडे गांभीर्यानं लक्ष दिलं पाहिजे. स्पर्धा असल्यामुळे वाहिन्यांनाही ठरावीक गोष्टी कराव्याच लागतात. मी आता अनुभवी कलाकार असले, तरी अमुकच तास काम करणार किंवा रविवारी मी येणार नाही, असं म्हणू शकत नाही; कारण असं केल्यानं मालिका भरडली जाते. जे कलाकार असं करतात, त्यांच्या मालिका दोन-तीन महिन्यांमध्ये बंद होतात.दोघांमध्ये तिसरा येतो, तेव्हा गैरसमज होतातच. त्यामुळे सुसंवाद होणं गरजेचं आहे. मी 'बिग बॉस' या कार्यक्रमात होते तेव्हा ती तिसरी व्यक्ती कोण होती, हे प्रेक्षकांनाही कळलं होतं. मी चुकीची असते, तर मला पुन्हा या मालिकेसाठी विचारलंच नसतं. तसंच निर्माते चुकीचे असते, तर मी परत आलेच नसते. आज मी पुन्हा मालिकेशी जोडली गेले आहे; पण त्यावेळी माझ्याशी वाद घातलेल्यापैकी एकही जण तिथे नाही. यातच सगळं आलं!मालिकेच्या वेळी जे वाद झाले, त्यानंतर इतर काही निर्मात्यांनी मला कामासाठी विचारलं. पण मला काम करू दिलं गेलं नाही. कायदेशीर बाबींमध्ये अडकवून मला काम करण्यापासून वेळोवेळी थांबवलं गेलं.

# खातेदारांना त्यांच्या ठेवी मिळण्यासाठी बँकांनी व्यापक जनजागृती करावी- जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील

## जिल्हाधिकाऱ्यांच्या हस्ते विशेष मोहिमेचा शुभारंभ ३२ खातेदारांना प्रमाणपत्र प्रदान

## उद्यम पोर्टल, बँकांमध्ये माहिती उपलब्ध



**जनसंचलन/बुलढाणा**

जिल्ह्यातील बँकांमध्ये दीर्घकाळ दावा न झालेल्या १.३६ लाख खातेदारांच्या ४८. ७२ कोटींच्या ठेवी संबंधित खातेदारांना किंवा त्यांच्या कायदेशीर वारसांना परत मिळण्यासाठी बँकांनी व्यापक जनजागृती करावी, तसेच नागरिकांनीही आपल्या बँकिंग व्यवहाराबाबत जागरुक राहावे, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी केल रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया यांच्या मार्गदर्शनानुसार बँकांमध्ये दीर्घकाळ दावा न झालेल्या ठेवी संबंधित खातेदारांना किंवा त्यांच्या कायदेशीर वारसांना परत मिळण्यासाठी जिल्ह्यात विशेष मोहीम राबविण्यात येत आहे. या मोहिमेचा जिल्हाधिकाऱ्यांच्या हस्ते जिल्हा नियोजन भवन येथे शुभारंभ सोमवारी करण्यात आला. यावेळी ३२ खातेदारांना ४ लाख ७० हजार रुपयांच्या ठेवी परत करण्यात आल्याबाबतचे प्रमाणपत्र प्रातिनिधीक स्वरुपात देण्यात आले. या कार्यक्रमाला जिल्हा पुनर्वसन अधिकारी सदाशीव शेलार, सेंट्रल बँकेचे क्षेत्रीय प्रमुख पंकज कुमार, स्टेट बँकेचे क्षेत्रीय प्रमुख नीरज कुमार, जिल्हा अग्रनी बँकेचे व्यवस्थापक के. के सिंग आणि खातेदार मोठ्यासंख्येने उपस्थित होते.

जिल्हाधिकारी किरण पाटील पुढे म्हणाले, बँकांनी या मोहिमेची व्यापक जनजागृती करावी. या जनजागृती मोहिमेते जिल्ह्यातील युवकांनीही सहभाग घ्यावा. खातेदारांनी आपल्या बँक खात्यातील व्यवहारांबाबत निष्काळजीपणा, दुर्लक्षितपणा न करता जागरुक राहून लक्ष ठेवावे. बँकिंग व्यवहारांबाबत नागरिकांनीही सजग राहावे. बँक खाते अद्ययावत करण्यासाठी बँकांच्या सुचनांनुसार ईकेवायसी, वारस नोंदणी, पत्ता, संपर्क क्रमांक आदी आवश्यक माहिती अद्ययावत करुन घ्यावी. बँकांनी खातेदारांना लोकसेवा हक्क कायद्यानुसार सहज आणि सुलभ पद्धतीने सेवासुविधा उपलब्ध कराव्या. जिल्ह्यातील १.३६ लाख दावे न झालेल्या ४८.७२ कोटींच्या ठेवी खातेदारांना किंवा त्यांच्या वारसांना मिळण्यासाठी बँकांनी जनजागृती करावी, अशा सूचना जिल्हाधिकारी किरण पाटील यांनी यावेळी दिल्या.

बँकामधील पडित रक्कम खातेदारांना किंवा त्यांच्या वारसांना देवून ही रक्कम व्यवहाराच्या मुख्य प्रवाहात यावी यासाठी रिझर्व बँकेचा निर्देशानुसार ही मोहीम राबविली जात आहे. या मोहिमेची मुदत ३१ डिसेंबरपर्यंत असली तरी ही मोहीम बँकांमध्ये सुरु राहणार आहे. दावे न झालेल्या खातेदारांची माहिती उद्यम पोर्टलवर आणि बँकामध्येही उपलब्ध करण्यात आली आहे. खातेदारांना बँकांचे सहकार्य राहणार आहे, त्यामुळे खातेदारांनी या योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन पंकज कुमार यांनी केले आहे. यावेळी स्टेट बँकेचे क्षेत्रीय प्रमुख नीरज कुमार यांनी मोहिमेची माहिती दिली

---

# ग्रामीण भागातील रस्ते विकासासाठी मुख्यमंत्री बळीराजा शेत/पाणंद रस्ते योजना




**जनसंचलन/ बुलढाणा**

ग्रामीण भागातील शेत व पाणंद रस्त्यांच्या मजबुतीकरणासाठी पूर्णपणे यंत्रसामग्रीच्या सहाय्याने जलद गतीने कामे करण्याच्या उद्देशाने ङ्ङ्मुख्यमंत्री बळीराजा शेत/पाणंद रस्ते योजनाफ्फ ही स्वतंत्र योजना महसूल विभागामार्फत राबविण्यास शासनाने मान्यता दिली आहे. याबाबतचा शासन निर्णय महसूल विभागाच्या दि. १४ डिसेंबर २०२५ रोजी जारी करण्यात आला आहे. या योजनेद्वारे मातोश्री ग्रामसमृद्धी शेत/पाणंद रस्ते योजनेस पूरक अशी सोपी व सुलभ कार्यपद्धती अवलंबण्यात येणार आहे. शासन निर्णयानुसार या योजनेच्या अंमलबजावणीसाठी ग्रामपंचायत, पंचायत समिती, जिल्हा परिषद बांधकाम विभाग/उपविभाग, प्रधानमंत्री/मुख्यमंत्री ग्रामसडक योजना विभाग तसेच वनजमीन असल्यास वनविभाग यापैकी कोणत्याही यंत्रणेमार्फत रस्त्यांची कामे करता येणार आहेत. तसेच, संबंधित शासन निर्णयात नमूद केल्यानुसार विधानसभा क्षेत्र समितीचे सदस्य सचिव असलेल्या उपविभागीय अधिकाऱ्यांना प्रशासकीय मान्यतेचे अधिकार प्रदान करण्यात आले आहेत. योजनेअंतर्गत घेण्यात येणाऱ्या कामांसाठी प्रत्येक टप्प्यातील प्रक्रिया तसेच विविध विभागांच्या जबाबदाऱ्या सविस्तरपणे स्पष्ट करण्यात आल्या आहेत. हा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या https://gr.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर तसेच buldhana.nic.in येथे डिजिटल स्वरूपात उपलब्ध असल्याची माहिती उपजिल्हाधिकारी रोहयो डॉ. जयश्री ठाकरे यांनी प्रसिद्धीपत्राव्दारे दिली आहे.

# शेतकऱ्याने तब्बल ५ एकर शेतातील आंबा बागेवर फिरवला नांगर...

## सतत दोन वर्षापासून अनुदानासाठी मारत होते कृषी विभागाच्या चकरा

## आंबा लागवडीपासून आतापर्यंत लाखो रुपयांचा झाला खच

**जनसंचलन/बुलढाणा**

महात्मा गांधी रोजगार हमी योजनेच्या माध्यमातून आंबा फळबाग लागवड करून दोन वर्षे उलटून गेली, मात्र अद्याप शाम पाटील या शेतकऱ्यांल त्याचे अनुदान न मिळाल्याने अखेर बुलढाणा जिल्ह्याच्या इसरूल येथील शेतकरी शाम पाटील भुतेकर यांनी आपल्या पाच एकर शेतातील ४५०० आंबा झाडांवर नांगर फिरवला आणि आंबा बाग नष्ट केलीय .. शेतकरी शाम पाटील यांना लागवडीपासून तर आतापर्यंत जवळपास १४ ते १५ लाखांचा खर्च आला असून हातात काहीही आले नाही.. कृषी विभागांकडे महात्मा गांधी रोजगार हमी योजनेच्या माध्यमातून अनुदान साठी अर्जाची पूर्तता सुद्धा केली, सतत दोन वर्ष कृषी विभागाच्या चकरा मारल्या, मात्र कृषी विभागाच्या अनास्थेमुळे अनुदान मिळाले नाही परिणामी नुकसान होत असल्याने अखेर त्यांनी आंबा बाग नांगराने काढून टाकली .. मात्र अनुदान न देणाऱ्या कृषी विभागाच्या अधिकारावर कारवाई करावी अशी मागणी त्यांनी केलीय



# अन्यथा हॅप्पी न्यू इयर कोठडीत होणार...

## मद्यपींवर राहणार पोलिसांची नजर: ठिकठिकाणी तगडा बंदोबस्तही असणार

जनसंचलन/खामगाव



सरत्या वर्षाला निरोप देऊन नववर्षाचे स्वागत करण्यासाठी ३१ डिसेंबरच्या रात्री जागोजागी पार्ट्या होतात. मद्यप्राशन करून वाहन चालविणे, मारामारीचेही प्रकार घडतात. सध्या राज्यात अनेक ठिकाणी आचारसंहिता असल्याने पोलिसांची तळीरामावर करडी नजर राहणार आहे थर्टी फर्स्टच्या पार्श्वभूमीवर शहरातील चौकाचौकांमध्ये पोलिसांचा ताफा राहणार असून ड्रंक अँड ड्राईव्हची कारवाई केली जाणार आहे. तसेच धिंगाणा घातला तर कोठडीची हवा खावी लागू शकते.

बुलढाणा जिल्ह्यात वर्षाच्या शेवटच्या रात्री नववर्षाचे स्वागत करण्यासाठी सर्वत्र जोरदार तयारी सुरू आहे; मात्र या उत्साहाच्या आड होणारे गैरप्रकार, मद्यप्राशन करून वाहन चालवण्याचे प्रकार, तसेच नुकत्याच पार पडलेल्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर यंदा पोलिस प्रशासनाने विशेष खबरदारी घेतली आहे. हुल्लडबाजीवर नियंत्रण ठेवण्यासाठी पोलिसांचा कडेकोट बंदोबस्त तैनात करण्यात येणार आहे. मद्यप्राशन करून वाहन चालवताना कोणी आढळल्यास त्यांच्याविरुद्ध थेट गुन्हा दाखल केला जाणार आहे. नगरपरिषद निवडणूक निकालाचा उत्साह अद्याप कायम असून, राजकीय कार्यकर्ते व इच्छुकांकडून मोठ्या प्रमाणावर पार्थ्यांचे आयोजन होण्याची शक्यता आहे. त्यामुळे यंदाचा थर्टी फर्स्ट प्रशासनासाठी अधिक आव्हानात्मक ठरणार आहे. तसेच नववर्ष साजरे करताना राजकीय प्रभावाचा वचपा काढण्याचे प्रकार घडण्याची शक्यता नाकारता येत नाही. या पार्श्वभूमीवर, पोलिस प्रशासन अलर्ट मोडवर राहणार आहे.

# गुणवत्तापूर्ण आरोग्य सेवा देणे ही प्रशासनाची प्राथमिक जबाबदारी -जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील

जनसंचलन/बुलढाणा

नागरिकांना सहज, सुलभ व वेळेत गुणवत्तापूर्ण आरोग्य सेवा उपलब्ध करून देणे ही प्रशासनाची प्राथमिक जबाबदारी असल्याचे जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी स्पष्ट केले. राज्यस्तरावर निश्चित करण्यात आलेल्या आरोग्य निर्देशांकांमध्ये जिल्हा कोणत्याही परिस्थितीत मागे राहू नये, यासाठी प्रभावी नियोजन, काटेकोर अंमलबजावणी व सातत्यपूर्ण देखरेख आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. जिल्ह्यातील आरोग्य सेवा अधिक सक्षम, गतिमान व लोकाभिमुख करण्याच्या उद्देशाने दि. २६ डिसेंबर २०२५ रोजी जिल्हा एकात्मिक आरोग्य व कुटुंब कल्याण सोसायटी नियामक समितीची संयुक्त सभा जिल्हाधिकारी डॉ. पाटील यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. या बैठकीस वैद्यकीय महाविद्यालयाच्या अधिष्ठाता डॉ. कैलास झिने, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. दत्तजय बिराजदार, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. अमोल गिते, सहायक जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. हरि पवार, अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. रंजित मंडाले, जिल्हा माता व बाल संगोपन अधिकारी डॉ. मिलिंद जाधव, जिल्हा क्षयरोग अधिकारी डॉ. वर्षा गुट्टे, स्त्री रुग्णालय वैद्यकीय अधीक्षक डॉ. पाटील, निवासी वैद्यकीय अधिकारी डॉ. प्रविण घोंगटे, जिल्हा आयुष अधिकारी डॉ. प्रशांत तांगडे, जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापक तसेच आरोग्य विभागातील विविध स्तरांवरील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. सभेमध्ये जिल्ह्यात राबविण्यात येत असलेल्या आरोग्य विभागाच्या सर्व योजना, कार्यक्रम, उपलब्ध मनुष्यबळ व साधनसामग्री यांचा सखोल, वस्तुनिष्ठ व नियोजनबद्ध आढावा घेण्यात आला. क्षयरोग, हिवताप, कुष्ठरोग, सिकलसेल, राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रम, नियमित लसीकरण, कुपोषण व मोतीबिंदू नियंत्रण कार्यक्रमांवर विशेष भर देण्यात आला.

# नववर्षाच्या पार्श्वभूमीवर राज्य उत्पादन शुल्क विभाग सक्रीय अवैध मद्य विक्री, वाहतूक प्रकरणी तक्रार नोंदविण्याची आवाहन

जनसंचलन/बुलढाणा




नववर्षाच्या आगमनाच्या पार्श्वभुमीवर जिल्ह्यातील विविध भागात अवैध वाहतुक तसेच विक्री मोठ्या प्रमाणात होतात. अशा घटनाना प्रतिबंध घालण्यासाठी राज्य उत्पादन शुल्क विभागामार्फत दि. ३१ डिसेंबरपर्यंत विशेष मोहिम राबविण्यात येत आहे. तथापि कोणत्याही अनुज्ञप्तीमध्ये विना परवाना मद्यविक्री किंवा अल्पवयीन तरुणांना दारु उपलब्ध होत असल्यास अशावर राज्य उत्पादन शुल्क विभागाकडून कडक कारवाई केली जाणार आहे. तसेच नागरिकांनादेखील काही तक्रारी असल्यास विभागाशी संपर्क करावा, असे आवाहन राज्य उत्पादन शुल्क विभागाचे अधीक्षक चारुदत्त हांडे यांनी केले आहे. नाताळ व नववर्ष आगमनाच्या अनुषंगाने राज्य उत्पादन शुल्क बुलढाणा कार्यालयाच्यावतीने अवैध मद्य निर्मिती, वाहतुक व विक्री वर प्रतिबंध घालण्यासाठी बुलढाणा जिल्ह्यातील कार्यक्षेत्रीय अधिकारी निरीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, बुलढाणा, राज्य उत्पादन शुल्क देऊळगाव राजा व राज्य उत्पादन शुल्क खामगाव व राज्य उत्पादन शुल्क, भरारी पथक यांच्याकडून जिल्ह्यातील विविध हातभट्टी ठिकाण, अवैध मद्यविक्री केंद्रावर छापे टाकुन कारवाई करणे चालु आहे. तसेच नववर्षाच्या अनुषंगाने आयोजित करण्यात येणाऱ्या पार्ट्या, हॉटेल्समध्ये होणारी मद्यविक्री यावर राज्य उत्पादन शुल्क विभागाची करडी नजर असणार आहे.

# ॲग्रोटेक २०२५ राज्यस्तरीय कृषी प्रदर्शनीला शेतकऱ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

जनसंचलन/बुलढाणा

डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या १२७ व्या जयंतीनिमित्त डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, कृषी विभाग व आत्मा, अकोला यांच्या संयुक्त विद्यमाने ङ्गॲग्रोटेक २०२५फ या राज्यस्तरीय भव्य कृषी प्रदर्शनीचे आयोजन दि. २७ ते २९ डिसेंबर २०२५ दरम्यान क्रीडांगण, डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, कृषी नगर, अकोला येथे करण्यात आले होते. या तीन दिवसीय कृषी प्रदर्शनीला राज्यभरातील शेतकऱ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. प्रदर्शनात विविध नवोन्मेषी कृषी तंत्रज्ञान, आधुनिक शेती अवजारे, सुधारित वाण, नैसर्गिक शेती तसेच हवामान बदलाच्या पार्श्वभूमीवर शाश्वत शेतीकडे मार्गदर्शन करणारी माहिती मोठ्या प्रमाणावर उपलब्ध करून देण्यात आली होती. यामध्ये कृषी विज्ञान केंद्र, बुलढाणा यांचे दालन विशेष आकर्षण ठरले. हवामान बदलामुळे शेतीसमोरील आव्हानांचा सामना करण्यासाठी कृषी विज्ञान केंद्र, बुलढाणा यांनी शेतकऱ्यांसाठी उपयुक्त व नाविन्यपूर्ण तंत्रज्ञान आपल्या दालनात सादर केले होते. या तीन दिवसांत लाखो



शेतकऱ्यांनी दालनास भेट देत ऊसाच्या विविध जाती व लागवड तंत्रज्ञान, आंबा, चिंच, टोमॅटो, वाल, हळद, पेरू व सीताफळ यांच्या प्रसिद्ध जाती, फुलशेती, तुती लागवड व रेशीम उत्पादन, पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय, गार्यीच्या विविध जातींची माहिती क्युआर कोडच्या माध्यमातून जाणून घेतली. तसेच नैसर्गिक शेती, हवामान आधारित कृषी सल्ला, शाश्वत शेतीचे महत्व, एआय आधारित कापूस पीक व्यवस्थापन, भरडधान्य लागवड तंत्रज्ञान व अत्याधुनिक शेती अवजारे याबाबत सविस्तर माहिती देण्यात आली. या दालनाला प्रधान सचिव(कृषी) विकासचंद्र रस्तोगी, डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ कुलगुरू डॉ. शरद गडाख, संचालक (विस्तार शिक्षण) डॉ. धनराज उंदिरवाडे, संचालक (संशोधन) डॉ. एस. एस. माने, मुख्य कार्यकारी अधिकारी अनिता मेश्राम, प्रधान वैज्ञानिक अटारी पुणे डॉ. शाकीर अली, विद्यापीठातील शास्त्रज्ञ व अधिकारी यांनी भेट देऊन कृषी विज्ञान केंद्राच्या कार्याबद्दल समाधान व्यक्त केले व पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. या राज्यस्तरीय कृषी प्रदर्शनीच्या माध्यमातून लाखो शेतकऱ्यांनी आधुनिक कृषी तंत्रज्ञानाची माहिती घेतली असून, त्याचा उपयोग शेती अधिक उत्पादनक्षम व शाश्वत बनविण्यास निश्चितच होईल, असे मत बुलढाणा कृषी विज्ञान केंद्राचे वरिष्ठ शास्त्रज्ञ तथा प्रमुख डॉ. अमोल झापे यांनी व्यक्त केले.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
आपल्या परिसरातील घडणाऱ्या घटना व बातम्या ९८२२७२०७८४ किंवा ९१२९५८२९५८ या व्हाट्सअप्प नंबर वर पाठवून आम्हाला सहकार्य करावे

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
===== बातम्या तसेच जाहिरातीसाठी संपर्क =====
संपादक - जितेंद्र कायस्थ ९८२२७२०७८४ ऑफिस :- ९१२९५८२९५८